सत्यमेव जयते

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

# ग्रंथालय संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र शासन

# 100 दिवसांचा कृती आराखडा

# मुद्दा क्र. 1 :- संकेतस्थळ

## ग्रंथालय संचालनालयाचे संकेतस्थळ






## ग्रंथालय संचालनालयाच्या संकेतस्थळाबाबतची माहिती

ग्रंथालय संचालनालयाचे संकेतस्थळ (www.dol.maharashtra.gov.in) हे मराठी व इंग्रजी या दोन भाषांमध्ये आहे. तसेच, सर्व शासकीय ग्रंथालयांमध्ये असलेल्या ग्रंथांचा शोध सुलभपणे घेण्यासाठी लिंक उपलब्ध करुन दिली आहे. संकेतस्थळावर नागरिकांची सनद (Citizen Charter), माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 या शिर्षाखाली अधिकाधिक माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात आले आहे. संकेतस्थळावर सर्व सामान्यांना समजेल अशा स्वरुपात अदयावत माहिती उपलब्ध आहे. तसेच, राज्य ग्रंथालय समिती, कर्मचाऱ्यांची दि. 01/01/2025 ची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

# मुद्दा क्र. 2:- केंद्र शासनाशी सुसंवाद

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी योजनेंतर्गत असलेले राज्य शासनाचे अंशदान वाढविणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. मराग्रं-2018/प्र.क्र. 139/2018/साशि-5 दि. 02/02/2019 अन्वये राज्य शासनाचे अनुदान रुपये 2.50 कोटी वरुन रुपये 3.00 कोटी करण्यात आलेले असून त्यानुसार केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्याकडे सार्वजनिक ग्रंथालयांचे समान निधीचे प्रस्ताव सादर करण्यात येतात.

# केंद्र शासनाशी सुसंवाद

Office of the principal accountant General (audit) - I maharashtra,mumbai
Statement of audit observation issued up to 30/06/2019 and outstanding on 31/12/2019
Department:-Directorate of Libraries, maharashtra state, Mumbai

| Sr no | Para-no<br>--------------<br>period | Subject<br><br>No.०८ period | Latest compliance | Remark |
|---|---|---|---|---|
| 01 | No.08 Period 01.12.2010 To 31,03,2013 | Rs5-30 crore, grants-in-grants-in-aid Disbursed to 914 public Libraries Liable For cancellation during Last three years | M201314002/27/05/2013 Year 2013-14 या बाबत संचालनालयाचे विस्तृत अभिप्राय सोबत जोडले आहेत | Year 2013-14 |
| 2(1) | Para No-1<br>Non - upgradation of public Libraries Date 01/04/2013to 31/12/2017 | Non -upgradation of public Libraries Date 01/04/2013to 31/12/2017 | SS -II(b )ch,II/0,w,n,o 957 date 08,02,018 या बाबत संचालनालयाचे विस्तृत अभिप्राय सोबत जोडले आहेत | Year 2017-18 |
| 2(2) | No-2<br>Non achievement of target fixed for Inspection of public labraries Date 01/04/2013t0 31/12/2017 | Non achievement of target fixed for Inspection of public labraries Date 01/04/2013t0 31/12/2017 | या बाबत संचालनालयाचे विस्तृत अभिप्राय सोबत जोडले आहेत | Year 2017-18 |
| 03A | 03A Non constitutionof state library council as per the Maharashtra public libraries Act,1967 | Non constitutionof state library council as per the Maharashtra public libraries Act,1967 | या सोबत संचालनालयाचे विस्तृत अभिप्राय सोबत जोडले आहेत | Year 2017-18 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 03 ( b) Non appointing of District Library commitee 01/04/2013 to 31/12/2017 | 03 ( b) Non appointing of District Library commitee 01/04/2013 to 31/12/2017 | महाराष्ट्रसार्वजनिक ग्रंथालये अधिनियम,१९६७, मधील प्रकरण २,कलम३,पोट-कलम(२)मध्ये राज्य ग्रंथालय परिषद गठीत करण्याची तरतूद आहे,( अधिनियमातील सदर तरतुदींच्या पृष्ठाची प्रत सोबत जोडली आहे ) | Year 2017-18 |
| 04 | Para No.4 01/04/2013 to 31/12/2017 Difference between bank statement and cash book and non reconciliation of cash book with bank pass book | Para No.०४ चे माहे डिसेंबर २०१७-२०१८मध्ये बँक मधील शिल्लक व रोख वहीतील शिलक यांचा ताळमेळ रोख वहीत नोंदविण्यात आले आहे १)वित्त विभाग शासन निर्णय क्र, अर्थसं-२०२०/प्र, क्र,६५/अर्थ-३दिनांक०४/०५/ २०२० व वित्त विभाग परिपत्रक क्र, संकीर्ण -२०२०/प्र क्र,६७/कोषा-प्रशा-५/दिनांक २६/०५/२०२० अनवये माहे मे-२०२० मध्ये बँकेमधील अखर्चित निधी च लनाने शासनजमा करण्यात आलेला आहे | Year२०१७-१८ माहिती सन २०१७-१८ सोबत जोडली आहे | |
| 05 | -------------- | -------------------- | ------------------- | |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 06 | Para No.-06 01/04/2013 to 31/12/2017 Non disbursement of Rs 264.09 Lakh to public Library By RRRLF | Para No.-06 01/04/2013 to 31/12/2017 Non disbursement of Rs 264.09 Lakh to public Library By RRRLF | ss-II(b)ch,II/o,w,no, ९५७ date,०८/०२/१८ Date,०१/०४/२०१३ To ३१/१२/२०१७ सोबत माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे | 2017-18 |



OFFICE OF THE PRINCIPAL ACCOUNTANT GENERAL (AUDIT) I, MAHARASHTRA, MUMBAI

STATEMENT OF AUDIT OBSERVATIONS ISSUED UPTO 30.06.2024 AND OUTSTANDING AS ON 31.12.2024

DIRECTOR OF LIBRARIES, MAHARASHTRA, MUMBAI

(Section 13)

| SR. NO. | UNIT_NAME | PERIOD | No.of IRs | PARA NO. | SUBJECT | IR. NO. / ISSUE DATE | YEAR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | DISTRICT : MUMBAI | | | | | | |
| 01 | THE DIRECTOR OF LIBRARIES, MAHARASHTRA STATE, TOWN HALL, FORT, MUMBAI | 01/04/2013 TO 31.12.2017 | 193 | 01 | NON-UPGRADATION OFPUBLIC LIBRARIES | M-201718085/957 DT.08.02.18 | 2017-18 |
| | | | 194 | 06 | NON DISBURSEMENT OF RS.264.09 LAKH TO PUBLIC LIBRARY BY RRRLF | | |

Assistant Audit Officer/AMG-IV(B)

महालेखापाल कार्यालयाकडून ग्रंथालय संचालनालयाचे सन 2015-16 ते 2024-2025 लेखा परिक्षण करण्यात आले असता 06 आक्षेप नोंदविण्यात आले होते. त्यापैकी, 4 आक्षेपांची पूर्तता करुन उर्वरीत 02 आक्षेपांची पुर्तता करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

# मुद्दा क्र. 3:- स्वच्छता





१०० दिवसाच्या कृती आराखडा संदर्भात,  ग्रंथालय संचालनालयामध्ये स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. जुने, अप्रचलित कागदपत्रे वेगळी करण्यात आली तसेच व आवश्यक कागदपत्रांची योग्य रितीने वर्गवारी केली आहे. कार्यालयीन परिसर व प्रसाधनगृहांची स्वच्छता नियमित राखली जाते.





# मुद्दा क्र. 4: - जनतेच्या तक्रारीचे निवारण

- P.G. Portal






# जनतेच्या तक्रारीचे निवारण बाबतची माहिती

- आपले सरकार व P.G. Portal पोर्टलवर प्राप्त तक्रारीचे निराकरण संचालनालयाद्वारे वेळोवेळी करण्यात येते. सद्यस्थितीत तक्रारीबाबत कार्यवाही प्रलंबित नाही.

•

- अभ्यागतांसाठी कार्यालय प्रमुखांना भेटीची वेळ निश्चित केलेली असून त्याबाबत चा तपशील फलकावर दर्शविण्यात आलेला आहे.

# मुद्दा क्र. 5 :- कार्यालयातील सोयी सुविधा व
# मुद्दा क्र. 6 :- कामकाजातील सुधारणा







महाराष्ट्र शासन
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य
नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.


ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई


अशोक मा. गाडेकर
प्र. ग्रंथालय संचालक
Ashok M. Gadekar
I/C. Director of Libraries
अभ्यागतांनी भेटण्याची वेळ
दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.००


कार्यासन - १
आस्थापना विभाग


श्री. संभाजी तु. नाइणकर
लिपिक टंकलेखक
टपाल विभाग
श्री. महेश म. लाड
वरिष्ठ लिपिक


कार्यासन - ३२
श्री. प्रताप के. सुर्यवंशी
कार्यासन - ३२

# कार्यालयातील सोयी सुविधा बाबतची माहिती व कामकाजातील सुधारणा

- ग्रंथालय संचालनालयामध्ये पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध असून, पिण्याचे पाणी व वापरायोग्य पाणी याची आवश्यकते नुसार साठवण क्षमतेची सोय उपलब्ध आहे.
- संचालनालयातील सर्व कार्यासनांतील अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्यांचे नामफलक व दिशादर्शक फलक ठिकठिकाणी  लावण्यात आले आहेत.
- NIC च्या ई-ग्रंथालय (eG-4) या आज्ञावलीद्वारे सर्व शासकीय ग्रंथालयांचे संगणकीकरण पहिल्या टप्प्यात करण्यात आले असून ग्रंथदेव-घेव सेवा या आज्ञावलीव्दारे दिल्या जातात.

# मुद्दा क्र. 7 :- अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयीन बाबी व कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर.






- ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील दैनंदिन प्रशासकीय कामकाजात ई- ऑफीसचा वापर सुरु करण्यात आलेला आहे. यामुळे दैनंदिन प्रशासन पारदर्शक व गतिमानतेने सुरु झालेले आहे.
- ऑनलाईन पध्दतीने प्रशिक्षण देण्याकरिता मिशन कर्मयोगी भारत या अंतर्गत iGOT या पोर्टलवर संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील गट अ ते ड संवर्गातील दि. 31 मार्च, 2025 अखेर कार्यरत असलेले 283 अधिकारी / कर्मचाऱ्यांची 100 टक्के नोंदणी पूर्ण करण्यात आली असून दि. 15 एप्रिल, 2025 अखेर 250 अधिकारी व कर्मचारी यांनी iGOT पोर्टलवरील ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे.

- ग्रंथालय संचालनालयातील सर्व अधिकाऱ्यांचे दि. 31/03/2024 चे गोपनिय अहवाल महापार या प्रणालीवर अपलोड करण्यात आले असून कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवालावर पुर्नविलोकन अधिकाऱ्यांची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.
- गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांची दि. 01/01/2024 चे तात्पुरती ज्येष्ठता सूची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे. तसेच, गट-क व गट-ड संवर्गातील दि. 01/01/2025 ची अंतिम ज्येष्ठता सूची संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- विभागीय चौकशीचे कोणतेही प्रकरणे संचालनालयस्तरावर प्रलंबित नाहीत.

## मुद्दा क्र. 8:- आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- सदर मुद्दा या कार्यालयास लागू नाही.

# मुद्दा क्र. 9 :- नाविन्यपूर्ण उपक्रम 1- सुकर जीवनमान



# ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली
# Library Grant Management System (LGMS)

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान मिळण्यासाठी आवश्यक असलेले वार्षिक अहवाल व अंकेक्षण अहवाल शासनाने विकसित केलेल्या ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणालीव्दारे (LGMS) सन 2023-24 वर्षापासून ऑनलाईन स्विकारले जातात. तसेच, या प्रणालीद्वारे ग्रंथालयांच्या बॅंक खाती एकाच वेळी ऑनलाईन थेट अनुदान वितरण करण्यात येत आहे. यामुळे ग्रंथालयांच्या वेळ, श्रम, पैसा यांची बचत झाली आहे. सद्यस्थितीत सन 2024-25 चा 10385 ग्रंथालयांना परिक्षण अनुदानाचा पहिला हप्ता प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला असून दुसरा /एकत्रित हप्ता 10766 ग्रंथालयांना वितरीत करण्यात आला आहे.

# विभागाच्या समावेशक डॅशबोर्ड कार्यान्वित करणे

राज्यातील जनतेला उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अधिनस्त सर्व जिल्ह्याची सांख्यिकीय माहिती संक्षिप्त व आलेख स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी डॅशबोर्डची निर्मिती शासनाने केली आहे. या पोर्टलवर (https://dashboardhtudu.maharashtra.gov.in) या संकेत स्थळावर ग्रंथालय संचालनालयाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. डॅशबोर्ड वर सार्वजनिक ग्रंथालयाच्या नावाचे एक बटन उपलब्ध करण्यात आले आहे. या डॅशबोर्डवर सार्वजनिक ग्रंथालयांतर्गत शासनमान्य अनुदानीत ग्रंथालयांची वर्षनिहाय व जिल्हानिहाय सांख्यिकीय माहिती दर्शविण्यांत आलेली आहे. यामध्ये वर्षनिहाय सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानाची माहिती व जिल्हानिहाय मध्ये वर्गणीदार सभासद, इमारतीचा तपशील, महिला व पुरुष वर्गणीदार सभासद संख्या ही सांख्यिकीय माहिती अनेक स्वरुपात दर्शविण्यात आलेली आहे.

सदर डॅशबोर्ड विषयीची कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात आली असून शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

## मुद्दा क्र. 10 नाविन्यपूर्ण उपक्रम 2 - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

- "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" याबाबत दिनांक 20.12.2024 रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. विद्यार्थ्यांचा बौध्दिक व सामाजिक विकासासाठी व त्यांच्यामध्ये ग्रंथ वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी दि. 01 जानेवारी, ते 15 जानेवारी, 2025 या कालावधीमध्ये वाचन पंधरवडा राबविण्यात आला आहे.
- जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी ग्रंथालयांची स्वच्छता मोहिम राबविली आहे. बहुतांश ग्रंथालयांमध्ये वाचन कार्यशाळा, ग्रंथ प्रदर्शन, व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करण्यात आले.

## नाविन्यपूर्ण उपक्रम 2 अंतर्गत :- क्षेत्रिय कार्यालयांना भेटी

- ग्रंथालय संचालक यांनी ग्रंथोत्सव-2024 च्या निमित्ताने माहे जानेवारी 2025 ते 31 मार्च 2025 या कालावधीत राज्यातील अधिनस्त 50 कार्यालयांपैकी 13 कार्यालयांना (उदा. गोंदिया, भंडारा, अहिल्यानगर, नाशिक, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कोकणभवन, वर्धा व सिंधुदूर्ग इ.) भेटी दिल्या आहेत. तसेच, माहे एप्रिल-2025 अखेर अंदाजे 5 ते 10 कार्यालयांना भेटी देण्यात येतील. उर्वरित कार्यालयांना प्रशासकीय अधिकाऱ्यांमार्फत भेटी देण्याचे नियोजन केले आहे.
- ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना 25 वर्ष सेवा झाल्याबदल संचालनालय स्तरावरुन प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

# क्षेत्रिय कार्यालयांना भेटी

शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर (मुलुंड) येथे भेट देण्यात आली.






# रत्नागिरी ग्रंथोत्सव- 2024 साठी मा. ग्रंथालय संचालक यांची उपस्थिती



उच्च व तंत्रशिक्षण विभाग
ग्रंथालय संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# धन्यवाद !

अशोक मा. गाडेकर
प्र. ग्रंथालय संचालक